International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.12 No.1 September – October 2024

# भारतातील शेतमजुरांच्या स्थितींचा अभ्यास

**डॉ. विनायक मारोती वागतकर**

*सहा.प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,*

*डॉ. पतंगराव कदम आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, पेण जिल्हा- रायगड*

*Corresponding Author - डॉ. विनायक मारोती वागतकर*

**DOI - 10.5281/zenodo.19365098**

***सारांश:***

*भारतातील विशेषतः ग्रामीण भागातील आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांची परिस्थिती स्पष्ट करण्यात आली आहे. या कामगारांमध्ये बांधकाम कामगार, शेतीमजूर, घरगुती कामगार, लहान उद्योगांतील कामगार इत्यादींचा समावेश होतो. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे, पण त्यांना नियमित वेतन, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण मिळत नाही. कामगारांना कमी मजुरी, अस्थिर रोजगार, आरोग्य सुविधा अभाव, शिक्षणाची कमतरता अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. महिला कामगारांची स्थिती अधिक कठीण असून त्यांना कमी वेतन व दुहेरी जबाबदारी सहन करावी लागते. शासनाने काही योजना (योजना, कायदे, कल्याणकारी उपक्रम) राबवले असले तरी त्यांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही.कामगार संघटनांचा अभाव असल्यामुळे त्यांचे हक्क प्रभावीपणे मांडले जात नाहीत.*

**प्रस्तावना:**

आपला भारत देश कृषीप्रधान व विकसनशील राष्ट्र सुध्दा आहे. कारण, या देशात मोठ्या प्रमाणावर बेकारी, दारिद्र्या, निरक्षरता आणि कुशल मनुष्य बळाचा त्याच बरोबर भांडवल, विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक शेतीचा अभाव इत्याची गोष्टी दिसून येतात. सध्याच्या स्थितीत भारतातील जनता जवळापास ६० ते ६५०% शेतीवर अवलंबून असल्याची दिसून येते, त्यात प्रामुखाने मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे, त्याचबरोबर शेतजमिनीचे सिमांतीकरण झाल्यामुळे शेतमजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच शेतमजूर हा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक बनला आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. विशेषतः शेतमजूर हे सुख्या अत्यत आर्थिक आणि सामाजिक दृश्या मागासलेपणाच्या वर्गात येतात. प्रामुखाने आदिवासी जमातील मोठ्याप्रमाणात लोक शेतमजुरीची कामे करताना आढळून येतात. सध्याच्या स्थितीत ग्रामीण भागात सामन्यत: रोख वेतन न देता धान्याच्या स्वरुपात दिला जात असल्यांचे आढळून येते. ते त्यांच्या मालकासाठी काम करतात तसेच त्यांच्याकडून मोठ्याप्रमाणात सक्तीने काम करून

घेतली जातात, त्यामुळे ग्रामीण भागात सर्वत्र परिस्थिती फार वाईट दयनीय अवस्था दिसून येते.

आपण विकसित देशाकडे पाहिले असता (USA) राष्ट्रातील शेतक-यांकडे पाहिल्यास शेतमजुरांचे प्रमाण अत्यल्प प्रमाणात दिसून येते.परंतु आपल्या भारत देशातील काही राज्यांचा विचार करता त्या पंजाब, हरियाणा, तामिळनाडू व केरळ ह्या राज्यातील बऱ्याच शेतमजुरांची परिस्थिती चांगली आहे. परंतु महाराष्ट्र राज्यचा विचार करता प्रामुख्याने विदर्भ व मराठवाडयातील शेतमजुरांची अत्यंत दयनीय स्थिति बाईट अवस्थेत जीवमान जगत आहेत. म्हणून शेतमजुरांचा एक महत्वाचा ज्वलंत प्रश्न आहे.

**शेतमजुरांची व्याख्या:**

"प्रामुख्याने आपणास असे म्हणता येईल की. जेथे काम करतो त्या जमिनीवर मुळीच हक्क नसतो अशा लोकांना शेतमजूर म्हणतात."

"शेतमजूर म्हणजे आपली स्वतः जमीन मुळीच मालकीची नसलेले आणि स्वत: ची उपजीविका उदरनिर्वाह भागवण्यासाठी दुस-यांच्या शेतीवर काम करणारे असे शेतमजूर होय".

**शेतमजूरांचे प्रकार:**

**१) भूमिधारी शेतमजूर :** ज्या शेतमजूर जवळ स्वतःला मालकीची जमीन असते परंतु त्यांचा त्या जमिनीवर उदरनिर्वाहासाठी अपुरी असते असे शेतकरी होत.

**२) भूमिहीन शेतमजूर :** ज्या जमिनीवर मुळीच मालकी नसलेल्या व उपजीविकेसाठी इतरांच्या जमिनीवर परिश्रम करणाऱ्या शेतमजुरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

**३) संबधित शेतमजूर:** जेव्हा शेतमजूर शेतमालकाकडे महिन्याचा वर्षाचा करार करून कामाला राहतात, अशा शेतमजुरांना संबधित शेतमजूर असे म्हणतात

**४) शेतमंजुरी करणारे शेतमजूर :** शेतमजूर रोजमंजुरीवर नेहमी इतरांच्या निरनिराळय शेतकऱ्यांच्या शेतीतीत काम करीत असतात.

**अभ्यास विषयाची निवड :**

भारतातील इतर व्यवसायातील लोकांचे राहणीमान बऱ्यापैकी उंचाल्यांचे आढळून येते, परंतु सध्या शेतीतील शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक पातळी अत्यंत खालावलेली आहे. कारण मोठ्या शेतकऱ्यांकडून शेतमजुरांची पिळवणूक होत असते व त्यांना त्यांचा कामाचा योग्य मोबदला मिळत नाही. तसेच इतर क्षेत्राचा विचार करता त्यांच्या तुलनेत वेतन दर फारच कमी मिळत असल्यचे दिसून येते व त्याचबरोबर त्यांचे मोठ्याप्रमाणात शोषण होताना आढळून येते.

विशेष: स्त्री व पुरुष यांच्या मजुरीत देखील मोठ्याप्रमाणात तफावत आढळून येते. त्यामुळे शेतीतील शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक पातळी अत्यंत खालावलेली आहे. शेतमजूर अत्यंत दारिद्रय खाली जीवनमान जगतात व त्यांचे जीवनमान कसे सुधारता येईल. तसेच त्यांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य, राहणीमान सुधारण्यासाठी व इत्यादीचा अभ्यास करण्यासाठी आवश्यकता वाटते म्हणून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) शेतमजुरांच्या आर्थिक समस्यांचा कारकांनाचा अभ्यास करणे.

२) शेतमजुरांच्या विविध प्रकारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये संदर्भग्रंथ, इंटरनेट व विविध अहवालांचा आधार घेण्यात आला आहे. या दुय्यम साधन सामुग्रीवरून संशोधन कार्य पूर्ण करण्यात आले.

**महाराष्ट्रातील शेतमजूरः**

महाराष्ट्रातील सन 1981 मधील पाहणीनुसार, एकूण कामकऱ्यांत 33.5 टक्के पुरुष, 37.7 टक्के स्त्री शेतकरी; तर 18 टक्के पुरुष शेतमजूर व 45.5 स्त्रियाः तर बिगरशेती कामकरी 48 टक्के पुरुष, 16.8 टक्के स्त्रिया असल्याचे दिसते. एकूण महाराष्ट्रामध्ये 34.8 टक्के शेतकरी, 26.8 टक्के मजूर तर बिगरशेती कामकरी 38.4 टक्के दिसतात. भारतात एकूण कामकऱ्यांपैकी 41.5 शेतकरी, 25.2 शेतमजूर, तर 33.3 टक्के बिगरशेती श्रमिक आहेत.

**शेतमजुरांचे हलाखीचे जीवनः**

मागील काही अनेक वर्षांपासून 25 वर्षांत पंचवार्षिक योजनांखाली ग्रामीण विभागात बऱ्याच सोयी-सुविधा वाढल्याचे आढळून दिसून येतात. त्यात अनेक खेडेगावापर्यंत रस्ते पोहोचले, बस वाहतूक सुरू झाली, वीज आली, शाळा-दवाखाने उघडले, दुकानांमधून, साबण, सोडा, प्लस्टिकची भांडी अशा अनेक निरनिराळ्या वस्तू आल्या, तसेच जवळपास अनेक गावात सीमेंटच्या इमारत आणि मोटरी मोटरसायकली दिसू लागल्या यापैकी कोणताही लाभ मिळाला नाही, कारण त्याच्याजवळ फारशी जमीन नाही, शिक्षण नाही, विशेष दुसऱ्याच्या शेतावर दिवसभर राबून कसेबसे पोट भरतात एवढेच त्याचे जीवनमन दिसून येते. जोवर मजुरी धान्याच्या रूपात मिळत असते तोवर, किंमतीत चढउतार झाला तरी त्यात काही किमान धान्य मजुरी करून प्राप्त होते. मागील काही 20 वर्षांत धान्याचा बाजार जसा तेजीत आला तसे धान्यरूपाने मजुरी मिळण्याचे प्रमाण कमी झाले. विशेषतः गेल्या 15 वर्षांत किंमती जेवढ्या झपाट्याने वाढल्या, त्यामानाने मजुरीचे दर वाढले नाहीत. सध्या परंतु शेतमजूर विखुरलेला, मागसलेला, त्यातच एकूणच कोरडवाहू शेतीत फार सुधारणा होत नाही. मजुरी वाढत नाही, कर्ज नाही, गहाण वस्तू सोडवून तरी आणायची कशी? वर्षभर कामही मिळत नाही. तर जीवन जगायचे कसे? हा शेतमजुरूरांचा प्रश्न निर्माण होतो. यामुळेच शेतमजुरांना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे.

**विश्लेषण :** भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यात शेमजुरांची संख्या जास्त आहे. पुढील तक्त्यात भारतातील राज्य व केंद्र शासित प्रदेश निहाय माहिती दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. 1 भारतातील राज्य निहाय पुरुष व स्त्री शेतमजुरांची संखा:**

| अ.क्र. | राज्य | पुरुष शेतमजुर | स्त्री शेतमजुर | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1) | आंध्रप्रदेश | 64,53,741 | 73,84,411 | 1,38,32,152 |
| 2) | अरूनाणाचलप्रदेश | 10,329 | 8,511 | 18,840 |
| 3) | आसाम | 8,32,508 | 4,31,024 | 12,63,532 |
| 4) | बिहार | 87,30,251 | 46,87,493 | 1,34,17,744 |
| 5) | छत्तीसगढ | 12,62,559 | 18,28,799 | 30,91,358 |
| 6) | गोवा | 15,970 | 19,836 | 35,806 |
| 7) | गुजरात | 25,09,651 | 26,52,007 | 51,61,658 |
| 8) | हरियाणा | 7,17,133 | 5,61,688 | 12,78,821 |
| 9) | हिमाचलप्रदेश | 55,658 | 38,513 | 94,171 |
| 10) | जम्मू काश्मिर | 1,90,339 | 56,082 | 2,46,421 |
| 11) | झारखंड | 14,85,322 | 13,65,975 | 28,51,297 |
| 12) | कर्नाटक | 26,20,927 | 36,06,015 | 62,26,942 |
| 13) | केरळ | 10,78,354 | 5,42,497 | 16,20,851 |
| 14) | मध्यप्रदेश | 35,18,368 | 38,82,302 | 74,00,670 |
| 15) | महाराष्ट्र | 49,24,034 | 58,91,228 | 1,08,15,262 |
| 16) | मणिपुर | 49,928 | 63,702 | 1,13,630 |
| 17) | मेघालय | 90,888 | 80,806 | 1,71,694 |
| 18) | मिझोराम | 12,775 | 17,008 | 26,783 |
| 19) | नागालॅंड | 15,985 | 14,922 | 30,907 |
| 20) | ओरिसा | 25,87,196 | 24,11,908 | 49,99,104 |
| 21) | पंजाब | 11,04,140 | 3,85,721 | 14,89,861 |
| 22) | राजस्थान | 10,55,332 | 14,68,387 | 25,23,719 |
| 23) | सिक्किम | 8,762 | 8,238 | 17,000 |
| 24) | तामिळनाडू | 42,56,360 | 43,81,270 | 86,37,630 |
| 25) | त्रिपुरा | 1,62,640 | 1,13,492 | 2,76,132 |
| 26) | उत्तरप्रदेश | 82,45,599 | 51,55,312 | 1,34,00,911 |
| 27) | उत्तराखंड | 1,90,494 | 69,189 | 2,59,683 |
| 28) | पश्चिमबंगाल | 50,80,236 | 22,82,721 | 73,62,957 |
| **केद्रशासित प्रदेश** | | | | |
| 29) | अंदमान निकोबर | 4,043 | 1,126 | 5,169 |
| 30) | चंदिगड | 461 | 102 | 563 |
| 31) | दादरा नगर हवेली | 5,429 | 9,286 | 14,715 |
| 32) | दमन दीव | 347 | 976 | 1,323 |
| 33) | दिल्ली | 11,224 | 4,549 | 15,773 |
| 34) | लक्षव्दीप | 000 | 000 | 000 |
| 35) | पांडेचरी | 42,117 | 30,134 | 72,251 |
| | **एकुण** | **5,73,29,100** | **4,94,46,230** | **10,67,75,330** |

**संदर्भ :- Census of India 2011 Population Profiles**

वरील तक्त्यातील २०११ च्या आकडेवारी वरून राज्यनिहाय शेतमजुरांचा विचार करता सर्वाधिक उत्तरप्रदेशात ह्या राज्यात 19939052 शेतमजुर आहेत. त्या खालोखाल बिहार आणि आंध्रप्रदेश या राज्यात शेतमजुरांची संख्या मोठ्याप्रमाणात आढळून येते. तर महाराष्ट्रात 1,08,15,262 इतकी शेतमजुरांची संख्या आहे. सर्वात कमी दमण-दिव, चंदीगड, अंदमान आणि निकोबार या राज्यात आहे. विशेषता लक्षब्दीप मध्ये शून्य संख्या इतकी शेतमजुरांची दिसुन येते, कारण ह्या राज्यात शेती शेतीकरिता वातावरण अनुकूल दिसुन येत नाही.

**शेतमजुरांच्या आर्थिक व दारिद्रय परिस्थितीची करणे**:

**१) बेकारी व अर्थबेकारी:** शेतमजुरांना एका वर्षात जवळ पास सहा महिने ते काही महिन्या पुरतेच काम मिळते त्यास फक्त (३ ते ६) महिने रोजर फक्त प्राप्त होतो, म्हणून त्या बेकारी व अर्थ बेकारी असे म्हणतात,

**२) मजुरीचा अल्प दर:** शेतमजूरांची काम करण्याची परिस्थिती, कामाचा अवधी व कामाचे स्वरूप पाहता कामाचा मोबदला म्हणून मिळणारी मजुरी फारच कमी तुटपुंजी प्राप्त होते.

**३) असंघटीत वर्ग :** इतर व्यवसायातील मजुरांच्या तुलनेत भारततीय शेतमजूरांची संख्या फार मोठी आहे तसेच शेतमजूर असंघटीत असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती करून घेण्याची शक्ती शून्य आहे.

**४) शेतमजूरांच्या प्रश्नांकडे नियोजन मंडळाने केलेले दुर्लक्ष**: फक्त दोन शेतमजूर चौकशी समित्यांनी सादर केलेल्या अहवालामुळे भारतातील शेतमजूर गुरंख्या पेक्षा ही वाईट जीवनमान जगत असताना दिसून येतात.

**५) मोठ्या शेतकऱ्यांनी केलेला विरोध:** शेतमजुरांना मिळणाच्या मजुरीत वाढ झाल्यास आपला लाभ कमी होईल व परिणामी आपले वास्तविक उत्पन्न कमी होईल यामुळे मोठे शेतकरी मोठ्याप्रमाणात विरोध करतात.

**६) शेतीचे यांत्रिकीकरण:** शेतीच्या यांत्रिकीकरण झाल्यामुळे शेतकऱ्यांना पूर्ण काम मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांत बेकारी आणखी भर पड़त असल्यांचे मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**७) शेती शेतमजूरांचे सीमांतीकरण**: १९५१ मध्ये शेती करणारे आणि शेतमजूर सुमारे ९७.२ दशलक्ष होते, आणि १९९१ मध्ये ते १८५.२ दशलक्ष झाले. १९५१ ते १९९१ या काळात ही संख्या २७.३ दशलक्ष वरून ७४.६ दशलक्ष झाली. म्हणूनच आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, १९५१ ते १९९१ पर्यंत मजुरांची संख्या तिप्पट वाढली, आणि १९५१ ते १९९१ पर्यंत टक्केवारी वाढ २८ टक्के ते ४० टक्के होती. अशाप्रकारे, आपण असे म्हणू शकतो की, भारतातील कामगारांचे आकस्मिकीकरण जलद गतीने वाढत राहिले, जमिनीच्या वाटूयांच्या आणि शेतीच्या शेतमजूरांचे किमतीही वर्षानुवर्षे कमी होतांना दिसून येतात.

**८) शेती शेतमजूरांची पुन:र्रचना**: भारतातील शेती कामगार असंघटित आणि विखुरलेले आहेत. ते अज्ञानी आणि निरक्षर आहेत. परिणामी, शेत शेतमजूरांना त्यांच्या दैनंदिन उदरनिर्वाहासाठी सौदेबाजी करण्याची आणि लढण्याची क्षमता नाही.

**९) रोजगार आणि कामाच्या परिस्थिती:** आपण आधीच चर्चा केल्याप्रमाणे, शेती कामगारांना बेरोजगारी आणि बेरोजगारीसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते, ते वर्षाचा काही भागच काम करतात आणि उर्वरित वेळ ते निष्क्रिय राहतात कारण,शेतात काम नसते किंवा त्यांच्यासाठी पर्यायी काम उपलब्ध नसते.

**१०) कर्जवाजारीपणा:** देशातील ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्था उपलब्ध नाही, म्हणून जेव्हा शेतकरी आणि शेतमजुरांना पैशाची कमतरता भासते तेव्हा ते जमीनदारांकडून उच्च व्याजदराने (कधीकधी ४०% ते ५०%) कर्ज घेतात, ज्यामुळे ते शेवटी कर्जबाजारी होतात.

**११) शेतीकामात महिलांना कमी वेतन:** भारतासारख्या देशात अजूनही पुरुषप्रधान व्यवस्था प्रबळ आहे. महिलांना शेतात आणि जमिनीवर खूप कष्ट करण्याची परवानगी आहे, परंतु त्यांना त्यांच्या पुरुष समकक्षांच्या तुलनेत कमी वेतन दिले जाते.

**१२) बालमजुरीचे प्रमाण जास्त:** भारतात बालमजुरीचे प्रमाण खूप जास्त आहे. एका सर्वेक्षणातून असा निष्कर्ष निघाला आहे की, बालकामगारांची संख्या १.७५ कोटी ते ४.४ कोटी दरम्यान आहे, जी खूप जास्त आहे. आशियातील सुमारे एक तृतीयांश बालकामगार भारतात आहेत.

**१३) स्थलांतरित मजुरांमध्ये वाढ:** सिंचन क्षेत्रातील मजुरांचे वेतन पावसाळी भागातील मजुरांच्या वेतनाच्या तुलनेत कमी आहे. यामुळे कोरड्या भागातून अतिवृष्टी असलेल्या भागात कामगारांचे स्थलांतर झाले.

**शेतमजुरांसाठी शासनाने केलेल्या उपाय योजना:**

**१) गुलामगिरी नष्ट करणे:** आजही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शेतमजूर गुलामगिरी स्थितीत जीवन जगत असताना आढळून येतात. त्यामुळे शेतमजुरांना थोड्या प्रमाणात का होईना रोजगार पुरवून गुलामगिरी कमी करता येईल.

**२) शेतमजुरांसाठी शेतकरी संघटना:** शेतकरी मजुरांच्या संघटना झाल्या तर त्यांना वेतन संरक्षण मिळून त्यांच्या जमीन मालकाकडून आणि सावकाराकडून होणारे शोषण थांबेल. त्यासाठी शेतमजुरांच्या संघटना स्थापनासाठी सक्रीय सर्वोतोपरी मदत करणे अत्यंत आवश्यकता आहे,

**३) कामाच्या विविध योजना :** शासनाने शेतमजुरांच्या फायद्यासाठी पंचवार्षिक योजनेत काही महत्त्वाच्या योजना सुचविण्यात आल्या आहेत. त्यात ग्रामीण भागात कामाच्या ठिकाणी निरनिराळ्या योजना घेऊन त्यांचे पुन:र्वसन केल्यास अधिक चांगले होईल.

**४) रोजगार हमी योजना :** शासनाने ग्रामीण भागात रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. त्यात गळती म्हणजे (भ्रष्टाचारचा अंश) राहता कामानये. तसेच त्यांना जास्तीत जास्त कसे काम देता येईल हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**५) भारतीय राज्य घटना :** भारतीय राज्य घटनेनुसार गुलामगिरिची प्रस्था राबविणे गुन्हा आहे त्यासाठी कायद्याने योजनांच्या माध्यमातून उपाय जोजना करणे काळाची गरज आहे.

**६) किमान वेतन दर कायदा :** सन १९४८ साली किमान वेतन दर कायदा पास करण्यात आला असून

राज्य सरकारांना तीन वर्षाच्यात शेतमजूरांसाठी वेतन दर निश्चित करण्याचे दरविण्यात आले आहे.

**७) कुळ कायद्यांची प्रभावी अमलबजावणी:** भारत स्वतंत्र झाल्या पासून सर्व राज्यातून कुळ कायद्याने जमीनधारी पद्धत नष्ट करण्यात आली आहे. कारण कुळांचे रक्षण आणि शेतमजुरांचे हीत संबंध राखण्यासाठी बहुतेक राज्यात असे कुळ कायदे ठरविण्यात आले आहेत.

**८) २० कलमी कार्यक्रम :** भारत सरकारने जुलै १९७५ साली २० कलमी कार्यक्रमचा स्वीकार करण्यात आत्ता असून त्यात विशेषतः भूमिहीन शेतमजूरांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविण्यात आले आहे.

१) वेठ बिगारी नष्ट करणे.

२) ग्रामीण भागातील सर्वच शेतमजूर, भूमिहीन मजुरांकडून तसेच ग्रामीण भागातील कारागीर व लहान शेतकऱ्यांकडून कर्जे वसूल करण्यावर बंदी करण्यात आली होती,

३) विशेषतः शासनाने कमाल जमीन धारणा या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**९) बंधपत्रित कामगारांचे उच्चाटन:** बंधपत्रितः कामगार शोषणकारी, अमानवी आणि उल्लंघनकारी असल्याने ते नष्ट करण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले आहेत, बंधपत्रित कामगारांना काढून टाकण्यासाठी कायदेविषयक प्रयत्न देखील केले गेले आहेत. १९७६ मध्ये, बंधपत्रित कामगार व्यवस्था (निर्मूलन) कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्यानुसार, देशाच्या विविध भागांमध्ये सुमारे २.५१ लाख बंधपत्रित कामगारांची ओळख पटवून त्यांना मुक्त करण्यात आले,

**निष्कर्ष:**

असंघटित क्षेत्रातील कामगार हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहेत, परंतु त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती अजूनही कमकुवत आहे. त्यामुळे कामगारांसाठी कायदेशीर संरक्षण, स्थिर रोजगार आणि सामाजिक सुरक्षा योजना प्रभावीपणे अमलबाजणी करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षण, कौशल्य विकास आणि जनजागृती यावर शासनाने भर दिला पाहिजे. शासन, समाज आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रित प्रयत्न करून या घटकांचा विकास साधला पाहिजे. विशेषं असंघटित कामगारांचे जीवनमान सुधारल्या शिवाय देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार नाही.

**संदर्भ सूची:**

१) श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे, 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालय पब्लिकेशन हाऊस २००४.
२) डॉ. प्रभाकर देशमुख-'श्रमाचे अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर २०१५.
३) रुद्रदत्त, के. पी.एम सुंदरम, 'भारतीय अर्थव्यवस्था' एस चाँद- २००९.
४) कवीमंडल 'कृषि अर्थशास्त्र' मंगेश प्रकाशन २००२.
५) Census of India 2011 Population Profiles
६) Google.com